# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

**दिनांक २९/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. उमरेड:— दिनांक ०४/०३/२०२० चे २३.०१ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. १५५/२०२० कलम ३७६(अ)(ब),३७६(एन एफ),३७६,५०४ भादवी सहकलम ४, ६, २१ (१) बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

नोव्हेंबर २०१९ ते दिनांक २३/०२/२०२० चे ०६.०० वा. सुमारास आरोपी वडील याने आपली अल्पवयीन मुलगी पीडिता ही एकटी घरी असतांना बळजरीने वारंवार शारीरिक संबंध केले. याबाबत पीडितेने आई आरोपी क्र. २. हिला सांगितले असता तिने कुणालाही सांगू नको आपली बदनामी होईल असे सांगितले. पीडित मुलीने सदर घटना आपले आजीला सांगितले व आजीने पीडित मुली सोबत झालेली सर्व हकीकत पीडितेच्या सख्या आईला सांगितले.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मसपोनि सोनाली राठोड, पो.स्टे. उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक २५/०७/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. डी. जे. जयस्वाल, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला १) कलम ३७६ (अ)(ब) भादंवि. मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू. दंड व दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास, कलम ३७६ (२)(एन) भादंवि. मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू. दंड व दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास व आरोपी क्र. २ हिला कोर्ट उठेपर्यंत शिक्षा व ५,०००/—रू. दंड व दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि शुभांगी वाजे तर कर्मचारी पोहवा श्री. कोराम यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर